# Community Policing

## मोहल्ला समीती

प्रस्तावनाः-

जनतेच्या सक्रीय सहकार्याशिवाय पोलीसांना आपले कोणतेही काम कार्यक्षमरित्या प्रस्थापित करणे शक्य नाही. जनतेचे सहकार्य मिळविण्यासाठी जे अनेक परिक्षण केल्या गेले आहेत त्यात असे दिसुन आले आहे की, मोहल्ला समिती ही सर्वात कारगर संस्था आहे.

उद्देश :-

मोहल्ला समिती ही प्रामुख्याने समाजात शांतात व सुव्यवस्था अबाधित राहावी. राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक वातावरण सौहादर्यपुर्ण राहावे या करीता मोहल्ला समीती गठीत करुन स्थानिक गुन्हेगार, समाज कंटक, विघातक क़त्य करणारे यांचेवर नियंत्रण ठेवण्याकरीता तसेच महत्वाचे सण, उत्सव ईत्यादी मध्ये मोहल्ला समीतीचा सक्रीय सहभाग घेण्यात येतो.

रचना :-

मोहल्ला समीती चा उद्देश हया पोलीस ठाण्याच्या बीटवार असुन प्रत्येक मोहल्ला समितीमध्ये सर्वसाधारपणे २० ते २५ सदस्य असतात. मोहल्ला समीतीचे सदस्य हे शक्यतो नगरसेवक , आमदार, खासदार, शिक्षक , वकील, पत्रकार निवृत्त पोलीस अधीकारी अशा सर्व समावेशक व्यक्तींचा समावेश असतो. समाजावर किंवा त्या भागात अशा सदस्यांचा किती प्रभाव आहे यास जास्त महत्व न देता, त्या व्यक्तीबाबत लोकांच्या मनात एक चांगली व्यक्ती म्हणुन आदर आहे या कडे विशेष लक्ष असावे लागतो.

# शांतता समीती

प्रस्तावनाः-

समाजामध्ये शुल्लक कारणांचे भांडवल करुन आपला स्वार्थ साध्य करण्याकरीता काही सामाजिक तत्वे हे सामाजिक स्वास्थ बिघडविण्याचा प्रयत्न करीत असतात. सामाजिक शांतता व सलोखा प्रस्थापित राहण्याकरीता समाजातील प्रतिनिधीत्व करणारे स्वयंसेवी संस्था, धर्मगुरू , मुल्ला मौलवी, बीशेप, समाजसुधारक, समाजाचे प्रतिनिधीत्व करणारे प्रतिष्ठित व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी ईत्यादींची मिळुन शांतता समिती गठीत करण्यात आलेली आहे.

उद्देश :-

भारतीय समाजामध्ये अनेक जाती-धर्म, पंत, असुन त्याचे सण, उत्सव, रितीरिवाज, परंपरा हया वेगवेगळया आहेत. परिणामतः सण उत्सवामध्ये काही अप्रिय घटना घडल्या अथवा घडण्याचा संभव आहे याबाबतची माहीत मिळताच शांतता समीतीच्या माध्यमातुन कायदा व सुव्यवस्था, सामाजिक व जातीय सलोखा प्रस्थापित करण्याकरीता शांतता समितीच्या माध्यमातुन बैठका आयोजित करण्यात येतात

रचना :-

पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावतील प्रतिष्ठा लाभलेल्या सर्व स्तरातील समाजातील एका नागरीकांची निवड करुन बीटवार शांताता समीतीची गठीत करण्यात येते.

**तंटामुक्त गाव मोहीम**

प्रस्तावना:-

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाचे शासन निर्णय एमआयएस/१००७/सीआर -२३८ /पोल -८, मंत्रालय मुबंई दिनांक १९ जुले २००७ नुसार माहात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम संपुर्ण महाराष्ट्रात राबविण्या बाबत आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र हे सजग, क्रियाशील व अनेक बाबतीत आद्यप्रवर्तक असे राज्य आहे. राज्यामध्ये अनेक धर्म, पंथ १८ पगड जाती उपजातीचे लोक तसेच अनेक प्रकारचे व्यावसाय , व्यापार व उदीम करणारे लोक या शिवाय स्थित विस्थपीत स्थलांतरीत अशा अणेक प्रकारचे लोक राहतात उपरोक्त विविधता व प्रचंड लोकसंख्या या मुळे राज्यातील तंटे व खटल्याचे प्रमाणही मोठे आहे.

गावात छोटया कारणावरुन तंटयाची सुरवात होते. छोटया तंटयाचे पुढे मोठया तंटयात रुपांतर होते कधीकधी दिवाणी तंटयातुन फौजदारी तंटे निर्माण होतात, त्यातुन कुंटुंबाची , समाजाची व गांवाची शातंता धोक्यात येते म्हणुन निर्माण झालेले तंटे लोकसहाभागाने, सामोपचाराने व आवश्यक तेथे प्रशासनाची मदत घेवुन सोडविण्याची व्यवस्था निर्माण होण्यासाठी शासनाने महात्मा गांधी तंटा मुक्त गांव मोहीमेची सुरवात केली.

उद्देश :- गाव पातळीवर तंटे निर्माण होवु नये म्हणुन उपक्रम राबीविणे, दाखल असलेल्या व नव्याने निर्माण होणाऱ्या तंटयाचे निराकरण करुन ते कमी करणे, गावासाठी गावातुनच लोकसहभागातुन तत्काळ व सर्वमान्य तडजोड घडवुण आनण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे, गावातील जनतेमध्ये जातीय व धार्मिक सलोखा, सामाजिक व राजकीय सामंजस्य आणि सुरक्षीततेची भावना निर्माण करणे, पोलीसांच्या कामामध्ये पारदर्शकता आणुन त्यांची जनमानसांतील प्रतिमा सुधारुन "जनतेचे सेवक "अशी प्रतिष्ठा प्राप्त करणे.

रचना :- सदर योजने करीता महाराष्ट्र राज्य राज्यस्तर , विभागीय स्तर , जिल्हा स्तर व गाव पातळीवर समती स्थापन करुन गाव पातळीवरील ग्रामपंचायतींना एक तंटामुक्त गाव समिती स्थापन करणे अनिवार्य आहे. सदर तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्षांची व सदस्याची निवड ग्रामसभा आयोजित करुन करण्यात येते.